# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**

**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**जा.क्र.मनपा/आस्था/976 /2025-26** **दि.20 /06/2025**

विषय :- ठेका पध्दतीने बालकामगारांची नेमणूक न करणेबाबत.

संदर्भ :- मा.आयुक्त महोदय यांचे दि.09/06/2025 रोजीच्या आढवा बैठकीतील निर्देश.

**<u>परिपत्रक</u>**

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या विविध विभागामध्ये कामकाज करणेकरीता ठेका पध्दतीने कर्मचारी पुरवठा करणेस विविध विभागांकडून ठेका देण्यात आलेला आहे.

सदर ठेक्यांतर्गत कार्यरत कर्मचाऱ्यांना नियुक्ती देतेवेळी त्यांची जन्मतारीख तपासुन ते बालकामगार नाहीत याची खातरजमा करणे आवश्यक आहे.

सबब सर्व विभागप्रमुख यांना सुचित करण्यात येते की, त्यांच्या विभागांकडून देण्यात आलेल्या तसेच पुढे देण्यात येणाऱ्या ठेक्याच्या अनुषंगाने सदर ठेक्यांतर्गत कोणताही बालकामगार कार्यरत असणार नाही, याची दक्षता घेणेबाबत तसेच बालकामगार कार्यरत असल्याचे निदर्शनास आल्यास ठेकेदार यांचेवर बालकामगार (प्रतिबंध आणि विनियमन) अधिनियम, 1986 अन्वये कारवाई करण्यात येईल, याबाबत ठेकेदारास लेखी सूचना निर्गमित कराव्यात.

(कल्पिता पिंपळे)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रति,
सर्व विभागप्रमुख,
मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रत :-

1) मा.आयुक्त महोदय
2) मा.अतिरिक्त आयुक्त (1) व (2)
3) उप-आयुक्त (सर्व)